# भारतीय लोकशाही पुढील आव्हाने

**सोनिया मारुती पाटील,** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

**सारांश :**

लोकशाही म्हणजे लोकांचे सत्ता लोकांनी चालवलेली प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सत्ता होय. आज जगात सर्वात लोकप्रिय शासन प्रकार म्हणून लोकशाही हा शासन पद्धतीकडे पाहिले जाते. त्यातच भारतीय घटनाकारांनी लोकशाही हा शासन व्यवस्थेचा एक प्रकार म्हणून विचार न करता एक जीवन प्रणाली म्हणून लोकशाहीला अग्रक्रम दिले होते. या अनुषंगानेच भारतातील लोकशाही राज्यव्यवस्था टिकून राहावी व तीला अधिक बळकटी प्राप्त होऊन सक्षम होण्याच्या हेतुने भारतीय घटनेत लोकशाहीच्या आधारभूत संरचनाही निर्माण केल्या गेल्या. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळात इथल्या लोकशाहीला वेळोवेळी वेगवेगळया संकटांना सामोरे जावे लागले आहे. या संकटाचा सामना करताना भारतीय जनता किंवा देशातील अन्य कोणत्याही घटकांच्या लोकशाही राजकीय व्यवस्थेवरील विश्वासाला आजवर तडा गेला नाही. हे खरे असे असले तरी प्रादेशिकता वाढ, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, धर्म व जातीचे प्राबल्य, भ्रष्टाचार व दहशतवाद अशा अनेक प्रश्नांनी भारतीय लोकशाहीच्या यशस्वी वाटचालीत आव्हानांची निर्मिती केली आहे. त्यामुळे या आव्हानांना सामोरे जाताना दीर्घकालीन उपाय योजना करूनच लोकशाहीच्या यशस्वीतेची वाटचाल सुकर करता येईल.

**प्रस्तावना :**

आधुनिक काळात जगातील अनेक देशांनी लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केला आहे. बहुतेक राष्ट्रांनी अप्रत्यक्ष म्हणजेच प्रतिनिधिक लोकशाहीचा स्वीकार केलेला आहे. परंतु लोकशाहीचे असलेले चार खांब स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या तत्वांची उपेक्षा झालेली आहे. आर्थिक व आण्विक स्पर्धा भांडवलशाही राष्ट्रांचे वाढते वर्चस्व जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण, दहशतवाद, आत्यंतिक राष्ट्रवाद, सामाजिक अस्थैर्य, सांस्कृतिक असमतोल अशा विविध समस्या लोकशाही असलेल्या राष्ट्रांना भेडसावत आहेत. त्यामुळे लोकशाहीसमोर अनेक आव्हाने अडथळे ठाण मांडून आहेत. ह्या आव्हानांना तोंड देऊन देशातील लोकशाही प्रगल्भ करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

'लोकशाही हा शासनाचा प्रकार असून ती एक जीवनपद्धती आहे.' या दृष्टीकोनातून प्रा. मॅक्सी, प्रा. लास्की, प्रा. गिडींग्ज यांनी लोकशाही विचारांची मांडणी केली आहे. आज भारतात आपल्याला लोकशाही ऐवजी 'पक्षशाही' दिसते. याच पक्षशाहीला महात्मा गांधींनी कडाडून विरोध केला होता. कारण पक्षीय हितसंबंधाचे राजकारण हे ठराविक, मुठभर, प्रतिष्ठीत लोकांसाठीचे असते. त्यात सर्वसामान्य माणूस भरडला जातो. बहुमताच्या निर्णयापुढे सर्वसामान्यांना शरणागती पत्करावी लागते ही आभासात्मक लोकशाही आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात विनोबांनी लोकशाहीची कल्पना 'लोकनीती' संदर्भात वापरली. लोकनीतीमध्ये संसद, पक्ष निवडणुकांना नाकारण्यात आले. त्यांना राज्याच्या दमनकारी शक्ती ऐवजी त्याची जागा एकनिष्ठ सामाजिक कार्यकर्त्यांनी घ्यावी असे वाटत होते. कोणत्याही प्रकारच्या सत्तेच्या हव्यासापासून कार्यकर्ते दुर असतील अशी त्यांची अपेक्षा होती. आज आपल्याला यापेक्षा नेमके वेगळे चित्र दिसते. कार्यकर्ते हे सत्तेच्या राजकारणात मश्गुल झालेले दिसतात. त्यामुळे त्यागी, नि:स्वार्थी कार्यकर्त्यांची फलटण तयार करून भारतीय लोकशाहीचे रक्षण करणे अनिवार्य झाले आहे. आपत्ती लोकशाही ही सत्तावान व नियंत्रित पक्षांकडून संपत्तीवान व निर्दयी, धूर्त माध्यमांद्वारा वापरली जात आहेत. त्यामुळे जनसामन्यांचे शोषण होत आहे. प्रा. सिली यांनी म्हटल्याप्रमाणे (Democracy is a government in which everyone has a share) लोकशाही हा शासनाचा असा प्रकार आहे की ज्यामध्ये संपूर्ण किंवा बहुतांशी लोक आपण निवडून दिलेला प्रतिनिधी मार्फत शासकीय सत्ता व बंधुता तत्वांचा आधार घेऊन व्यक्ती स्वतंत्र्य आणि व्यक्ती विकास यांना महत्त्व दिलेले असते. लोकशाहीचा कारभार लोकांचा संमतीतून आणि टिकेतून चालतो लोकशाही एक राजकीय जीवन प्रणाली आहे की जेथे व्यक्तीच्या सर्वागीण विकासातून समाजाचा विकास अशी लोकशाहीची धारणा असते स्वातंत्र्य, समता, बंधुत्व सहकार्य लोक मताचा पाठिंबा सामाजिक न्याय कल्याणकारी राज्य ही तत्वे गृहीत धरून लोकशाहीचा कारभार चालवला जातो. आज भारतीय लोकशाही एका स्थित्यंतरातून मार्गक्रमण करीत असताना तिच्या यशापयशाचा व तिच्यासमोरील आव्हानांचा साक्षेपाने धांडीका घेऊन तिच्या निकोपतेसाठी उपाययोजना सुचविणे राज्यशास्त्राच्या अभ्यासकांचे प्रथम कर्तव्य आहे.

**उद्दिष्टे :**

१) लोकशाही प्रकियेतील स्थित्यंतरांचा आढावा घेणे.

२) लोकशाही पुढील आव्हानांचा आढावा घेणे.

३) भारतीय लोकशाहीचे स्वरूप समजून घेणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये वर्तनात्मक, विश्लेषणात्मक व ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. भारतीय घटनाकांराचाही लोकशाही शासन पध्दतीवर पूर्ण विश्वास होता. मात्र त्यांनी शासनव्यवस्थेचा एक प्रकार म्हणून लोकशाहीचा विचार केला नाही तर समाजाच्या निरनिराळ्या घटकामध्ये सहिष्णूवृत्ती निर्माण करणारी, गरीब-श्रीमंत, सबल-दुर्बल अशा समाज घटकांच्या परस्पर सहकार्याने व सामजस्याने विकास घडवून आणण्यास साहयभूत ठरणारी, प्रत्येकाला आर्थिक व सामाजिक दृष्टीने विकासाच्या समान संधी मिळवून व त्यातून सुरळीत व निश्चित पद्धतीने जीवन जगण्याची हमी देणारी एक आदर्श व्यवस्था व एक जीवन प्रणाली म्हणून लोकशाहीकडे पाहिले होते. त्यामुळे घटनाकारांनी लोकशाहीच्या सिद्धांत व मूल्यावर विश्वास देवूनच त्यांनी या शासन पद्धतीचा भारताच्या उज्वल भवितव्यासाठी स्वीकार केला.

**लोकशाही समोरील आव्हाने :**

जगामध्ये दोन तृतीयांश देशात लोकशाही शासन पद्धती स्वीकारलेली आहे. लोकशाही राष्ट्रात प्रादेशिक प्रातिविधित्वाची पद्धती स्वीकारलेली आहे. संसदीय अध्यक्ष नियंत्रित मार्गदर्शक अशा विविध स्वरूपाच्या लोकशाही पद्धतीने निर्माण झालेल्या आहेत. तिसऱ्या जगातील बहुसंख्य राष्ट्रात लोकशाहीत शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. परंतु स्वातंत्र्य, समता, न्याय अशा लोकशाही तत्वांची तेथे उपेक्षा झालेली आहे. जागतिक आर्थिक व अनेक स्पर्धा भांडवलशाही देशांचे आर्थिक मक्तेदारी वाढता दहशतवाद आक्रमक राष्ट्रवाद सामाजिक अस्थिरता सांस्कृतिक असमतोल अशा विविध समस्यांनी तिसऱ्या जगातील लोक.........

**१) प्रादेशिकता:**

प्रादेशिकतेची सुरुवात भाषवादातून झाली आहे. भाषावार प्रांतरचना करण्यास स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसने तत्वतः मान्यता दिली होती. पण स्वातंत्र्यानंतर फाळणीमुळे ही मागणी मागे पडली. भाषावार प्रांतरचनेच्या संदर्भात अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एस.के.दार यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला गेला होता. या आयोगाने भाषेऐवजी प्रशासकीय सोयीने प्रांत पुनर्रचना करावी असे सांगितले. अर्थात यास विरोध झाला. पुन्हा जे.व्ही. पी. समिती अस्तित्वात आली. या समितीनेही दार आयोगाच्या शिफारशीचा पुनःरुच्चार केला. या अहवालाच्या संदर्भात आंध्रप्रदेशातील पोट्टी श्रीरामलू यांनी आमरण उपोषण करून आत्मसमर्पण केले. अशा रीतीने भारत सरकारला भाषिक बाजारावर पहिली मान्यता द्यावी लागली. पुढे अशा मागण्या वाढतच गेल्या. संयुक्त महाराष्ट्राचा लढा होऊन गुजरात आणि महाराष्ट्र ही स्वतंत्र राज्ये निर्माण झाली. १९५३ ला राज्यपूनर्रचना मंडळ स्थापन झाले. व १९५३ ला मंडळाच्या शिफारशीवरून संसदेने एका कायद्याने भाषिक आधारावर राज्याची निर्मिती केली आणि छोट्या भागांना केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा दिला. मद्रास प्रांतातील तेलगू भाग वेगळा करून आंध्र प्रदेशाची मागणी मान्य केली. १ मे १९६० ला मराठी भाषेवर आधारित महाराष्ट्राची महाराष्ट्राची निर्मिती झाली. विविध भागातून पुढे येत राहिल्या व घटक राज्यांची संख्या वाढत राहिली.

प्रांतवादातून राज्य-राज्यात संघर्ष उद्भवले. भाषिक आधारावर निर्माण झालेले संघर्ष, सीमा प्रश्न, राजधानी स्वरुपात निर्माण झालेले प्रश्न, पाणी वाटप, स्थलांतर इत्यादी मधून प्रादेशिकतेचे स्वरूप अधिक तीव्र होत आहे. उदा. महाराष्ट्र व गुजरात संदर्भात मुंबईचा प्रश्न, पंजाब व हरियाणाचा चंदीगडचा प्रश्न, कावेरी पाणी प्रश्नावर कर्नाटक व तामिळनाड संघर्ष, बेळगांव, निप्पाणी व कारवार यासंबंधी महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील संघर्ष इत्यादी.

१९९६ मध्ये देवेगौडा पंतप्रधान असताना केंद्रात प्रादेशिक पक्षाचे सरकार होते. १९९९ पासून वाजपेयी पंतप्रधान असताना त्यांना शिवसेना, तेलगू देसम, डी.एम.के. या प्रादेशिक पक्षांचा आधार होता. २००८ पासून मनमोहनसिंगांना देखील राजद, मुस्लिम लीग, लोकजनशक्ती इत्यादीच पाठिंबा घ्यावा लागतो. त्यामुळे प्रादेशिक पक्षाचे महत्त्व वाढते आहे.

नोव्हेंबर १९५६ साली नीलम संजीव रेड्डी आंध्रचे मुख्यमंत्री झाले श्राणि हैद्राबाद ही राज्याची राजधानी झाली. तेलंगणाचे नऊ जिल्हे मागासलेले होते व त्यामानाने आंध्रप्रदेशाचा भाग जास्त पुढारलेला होता तेथे शेती व व्यापार मोठ्या प्रमाणात होता. या काळात आपण सर्वच बाबतीत आंध्रपेक्षा मागासलेले आहोत अशी भावना तेलंगणात निर्माण झाली व आंदोलनेही तीव्र होत गेली. बऱ्याच राज्यात याप्रमाणे चित्र पहावयास मिळते. जनतेत अंसतोष निर्माण होतो. नेतृत्वाचे द्रष्टेपण कमी पडते आहे. राष्ट्रीय एकात्मतेस ते घातक ठरते आहे. लोकशाही बळकट होण्याऐवजी लोक राजकारणाकडे उदासीनतेच्या भूमिकेतून पाहत आहेत. राज्यघटना निर्मितीची प्रक्रिया सूरू झाल्यापासून भाषेच्या आधारावर इथल्या घटक राज्याची निर्मिती झाल्यानंतर सुद्धा प्रादेशिकतेचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. देशातील विविध घटक राज्यांना व त्यातील भागांना स्वत:चे वेगळेपण हवे असतानाच सामाजिक, सांस्कृतिक वेगळेपणाची जगाला ओळख करून देण्याच्या चळवळी सुरु आहेत. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा विविध आधारावर काही राज्यांना आपल्यावर अन्याय होत आहे. या भावनेतून स्वतंत्र

सार्वभौम राज्याची मागणी पुढे येत आहे. प्रादेशिक पक्षातील प्रांतभिमान तसेच धर्मातील प्रखरता अशा अनेक कारणामुळे राज्यातून फुटून निघण्याची भाषा वापरली जाते. यातून प्रादेशिकतावादाचा उदय झाला असून प्रादेशिकतावादाने लोकशाही समोर अनेक प्रश्न निर्माण केले आहेत.

**२) भ्रष्टाचार :**

देशातील राजकारणी व नोकरशाही यांच्यातील अभद्र भूती हे देशातील भ्रष्टाचाराचे मुख्य उगमस्थान आहे गेले. वर्षभर आपल्या कानी आदर्श घोटाळा, बॉम्बस्फोट, नक्षलवाद्यांच्या व माओवाद्याच्या वाढत्या कारवाया इत्यादी बाबतच्या बा........ पडत आहेत. भ्रष्ट्राचारविरोधी अण्णा हजारे यांनी रणशिंग फुंकले आहे. सर्व स्तरावरील लोकांचा व विशेषतः तरुणांचा प्रचंड पाठिंबा त्यांना मिळाला आहे व भ्रष्टाचाराबद्दल प्रचंड जाणीव जागृती त्यांच्या आंदोलनाने केली आहे. पण भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी भ्रष्टाचाराविरोधी कठोर कायदा संसदीय लोकशाहीत शक्य आहे काय? याचाही विचार करणे आवश्यक आहे. या संदर्भात बाबुराव चंदावार म्हणतात की, "भ्रष्टाचाराचा विरोध करणाऱ्यांनी व लोकपाल विधेयकाची मागणी करणाऱ्यांना भ्रष्टाचार कसा नष्ट करता येईल याची संसदीय लोकशाहीला अनुसरून जे काही करता येण्यासारखे असू शकेल किंवा आहे त्याची सुस्पष्ट कल्पना भ्रष्टाचार विरोधाची घोषणा करणाऱ्याजवळ नसावी व नाही असे वाटते आणि म्हणून भ्रष्टाचार विरोधी घोषणा नुसत्या वल्गना ठरतात व भ्रष्टाचार विरोधी चळवळ हा पाण्यावर रेघा ओढण्याचा प्रयत्न ठरतो." चंदावार यांच्या या मताचा परामर्श घेता. आपण सर्वांनीच हे मान्य करावयास हवे की आज आपण कुठेतरी अधांतरी चाचपडत आहोत. कुठेतरी आपण मूलभूत दृष्टीकोन स्वीकारण्याची आवश्यकता आहे त्यामुळे भ्रष्टाचार हे लोकशाहीसमोरील एक मोठे आव्हान बनले आहे.

**३) दहशतवाद**

नक्षलवादाचे मोठे आव्हान भारतीय लोकशाहीसमोर उभे आहे. नक्षलवादामुळे भारताची एकता आणि अखंडता धोक्यात आली आहे. देशातील / बाहेरील पाच-दहा दहशतवादी किंवा मूठभर नक्षलवादी संपूर्ण देशाला वेठीस धरतात ते कुणाच्या पाठिंब्यावर त्यांचा पाठिंबा जर त्यांना मिळाला नाही तर ते आपल्या भूमीत दहशतवादी कृत्ये करू शकतील काय? किंवा नक्षलवादी घातपाती कारवाया करू शकतील काय? निश्चित करू शकणार नाही. मग प्रश्न हा आहे की त्यांना पाठिंबा कोणाचा मिळतो. या प्रश्नांची दोन उत्तरे असू शकतात. एक म्हणजे मतांच्या राजकारणासाठी कुठल्याही मार्गाचा अवलंब करणारा राजकारणी वर्ग, तर दुसरीकडे मूलतत्त्ववादी फॅसिस्ट प्रवृत्ती असणारा वर्ग. या दोन घटकांचा पाठिंबा दहशतवादी व नक्षलवाद्यांना मिळत आहे व त्यातूनच दहशतवाद व नक्षलवाद व त्यांची घावपाती कृत्ये वाढत आहेत व एका दुष्टचक्रामध्ये आपण अडकलो आहोत. त्यातून बाहेर कसे पडायचे हीच लोकशाही पुढील प्रमुख समस्या आहे.

**४) धर्म आणि जात :**

खरेतर धर्म सर्व समाजाला एकत्रित धरून ठेवण्याचे कार्य करतो. परंतु या देशाचा मात्र उलट अनुभव आहे. इथे धर्म संघटनापेक्षा विघटनात्मक शक्ती म्हणून कार्य करताना आढळतो. आज हिंदू प्रमुख धर्माशिवाय जैन, बौद्ध, पारशी, ख्रिश्चन, मुस्लिम इत्यादी धर्माचेही लोक भारतात राहतात. बहुसंख्य लोक स्वधर्मविषयी स्वाभिमान बाळगून इतर धर्मीयांना तुच्छ लेखण्याचा प्रयत्न करतात. आजही हिंदूच्या मनान मुसलमानांविषयी अविश्वास मुस्लिमांना हिंदूपासून असुरक्षितता वाटत असल्याने दोन्ही धर्मात वारंवार दंगली होताना दिसतात. दंगलीचे स्वरूप हिंदू मुस्लिमांपुरतेच मर्यादित नाही तर हिंदू विरुद्ध शीख, हिंदू विरुद्ध दलित असेही बनले आहे. मुस्लिम धर्मातर्गत पंथ आहेत त्या पंथामध्येही संघर्ष चालू असतो. हिंदूमध्येही राष्ट्रीय स्वयंसेवक संघ रामराज्य परिषद, हिंदू महासभा इत्यादी धार्मिक संघटना आहेत. या संघटना परस्परविरोधी वातावरणात वावरत आहेत. राजकारणी मात्र नेमक्या पाच संधीचा फायदा घेऊन स्वत:चे मतलबी राजकारण खेळत आहेत. सत्ता प्राप्तीचा एक मार्ग धार्मिक जमातवादी शक्तींना खतपाणी घालून मानवी जीवनाशी क्रुर खेळ खेळत आहेत. धर्माधिष्ठित राजकारणातून प्रांतवादाची एक नवीनच समस्या भारतीय लोकशाहीसमोर आली आहे. धार्मिक प्रथांना पुढे ठेवून आर्थिक व सामाजिक परिवर्तनापासून लोकांना दूर ठेवण्याचा प्रत्यन विविध पक्षांकडून केला जात आहे. काही अल्पसंख्यांक तर बहुसंख्यांकापासून सुरक्षितता मिळविण्यासाठी, परकीय शक्तीशाही हातमिळवणी करत असतात. ही बाब भारतीय लोकशाहीच्या भविष्याच्या दृष्टीने अतिशय घातक आहे.

**जात-**

भारतीय राजकारण म्हणजे जातीयता आणि जातीयता म्हणजे भारतीय राजकारण असे समीकरण निर्माण झाले आहे. राजकीय जीवनातील बहुतेक सर्व प्रश्नांचा विचार जातीयवादी दृष्टिकोनातून केला जातो. निवडणूक साठी उमेदवार ठरविण्यापासून राजकीय पक्षांचा कार्यक्रम निश्चित करण्यापर्यंत प्रत्येक बाबतीत जातीचा संदर्भ नेहमीच विचारात घेतला जातो.

भारतातील बहुतेक घटक राज्यांच्या राजकारणांवर तेथील प्रभावशाली जातीने आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. उदा. महाराष्ट्रात मराठा, कर्नाटकात वक्कलिंग व लिंगायत, आंध्रात रेड्डी व खम्मा, उत्तर भारतातील काही राज्यात जाट व ठाकूर, बिहारमध्ये यादव व कुर्मा इ. आपण लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केला असला तरी सामान्य माणूस आपल्या जातीच्या कोषातूनबाहेर पडावयास तयार नाही. निरक्षर व्यक्ती जातीच्या आधारे स्थानिक संस्थांच्या निवडणूकांपासून ते लोकसभेच्या निवडणुकांपर्यंत निवडून येतात व प्रसंगी मुख्यमंत्रीहि होतात. राज्यस्थानात तर ''जाट की बेटी जाट को, जाट का व्होट जाट को'' अशी घोषणाच प्रचलित आहे.

जातींच्या भीतीमुळे भारतीय समाज अगोदरच विविध गटांत विखुरला गेला. त्यातच जातीय राजकारणाची भर पडल्यामुले देशतील जनतेच्या मनात एकात्मतेची भावना निर्माण करणे अतिशय कठीण होते. भारतीय लोकशाहीपुढे असलेल्या आव्हानांपैकी जात अतिशय महत्त्वाचे आहेत.

**निष्कर्ष:**

प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे भारतीय लोकशाही स्वरूप स्पष्ट करून लोकशाही पुढे निर्माण झालेल्या असंख्य आव्हानांचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. भारतीय राज्कारांतील सामाजिक विषमता, भ्रष्ट्राचार, धार्मिकतेचे राजकारण, जातीयता, प्रादेशिकतावाद यासारखी आव्हाने भारतीय लोकशाही पुढे उभी आहे. त्यातूनच भारतीय लोकशाहीला विशुद्ध स्वरूप प्राप्त झाल्याचे दिसते. त्या आव्हानांना तोंड देण्यासाठी भारतीय नागरिकांनी जागरूक सतर्क असणे गरजेचे आहे.

**संदर्भ:**

१) भारतीय राजकीय व्यवस्था – भोळे भा.ल.

२) भारतीय राज्यव्यवस्थेच्या पुनर्रचनेची दिशा व दृष्टी- चंदावार बाबुराव, नवभारत डिसें. २०११

३) लोकशाही, निवडणुका आणि सुशासन –संपादक प्रा. डॉ. भारती पाटील मानव्यशास्त्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर २०१८

४) भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण - भोळे भा.ल., पिंपळापूरे पब्लिशर्स, नागपूर, २००३

५) समकालीन भारतीय राजकारण- पळशीकर सुहास, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४

६) राजकारणातील जाती- रजनी कोठारी